ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४८ • गुरुवार दि.१२ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

विलिनीकरणावरुन शरद पवारांच्या राष्ट्रवादीत घमासान

वेगवेगळ्या चार भूमिका;रोहित पवारांचा सत्तेत जाण्यास ठाम विरोध




मुंबई/प्रतिनिधी- अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एकत्रीकरणाच्या हालचालींना वेग आल्याची चर्चा असतानाच शरद पवार गटात मात्र अंतर्गत मतभेद उघड होऊ लागले आहेत. विलिनीकरण करून सत्तेत सहभागी व्हायचे की स्वतंत्र राजकीय अस्तित्व कायम ठेवायचे, यावरून पक्षात घमासान सुरु झाले आहे. विशेष म्हणजे, या मुद्द्यावर पक्षात दोन नव्हे, तर चार वेगवेगळे मतप्रवाह असल्याची माहिती समोर येत आहे. ज्येष्ठ नेत्यांना सत्तेत जाण्याची घाई असताना आमदार रोहित पवार यांनी मात्र या भूमिकेला विरोध केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत पडद्यामागे राजकीय हालचाली सुरू असल्याचे सांगितले जाते. मुंबईतील शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी नुकतीच पक्षाच्या प्रमुख नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, शशिकांत शिंदे आणि सुप्रिया सुळे उपस्थित होते. विलिनीकरणाच्या संभाव्य निर्णयावर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. आ.रोहित पवार हे देखील बैठकीसाठी सिल्व्हर ओक येथे पोहोचले होते. मात्र, बैठकीचा विषय विलिनीकरण असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तेथून काढता पाय घेतल्याची चर्चा आहे. या घडामोडीमुळे रोहित पवार यांची नाराजी पुन्हा चर्चेत आली आहे.

पक्षातील ज्येष्ठ आमदारांचा एक गट दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण करून सत्तेत सहभागी होण्याच्या बाजूने आहे. राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी आणि सत्तेतील सहभागातून पक्षाला बळ देण्यासाठी हा पर्याय स्वीकारावा, असे या नेत्यांचे मत असल्याचे सांगितले जाते. बहुतांश ज्येष्ठ आमदारांचा या भूमिकेला पाठिंबा असल्याचीही चर्चा आहे. मात्र, रोहित पवार यांना भाजपसोबत सत्तेत जाणे मान्य नसल्याचे सांगितले जाते. स्वतंत्र राजकीय भूमिका कायम ठेवून पक्षाने विरोधी राजकारण करावे, अशी त्यांची भूमिका असल्याची चर्चा आहे. रोहित पवार यांच्या भूमिकेला दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे पुत्र आ. रोहित पाटील यांनीही पाठिंबा दर्शविल्याचे **पान ४ वर**

सोलापूरात विमान धावपट्टीवरुन घसरले!

उड्डाणापूर्वीच अपघात; महिला शिकाऊ वैमानिक सुखरुप

सोलापूर : राज्यात गेल्या काही काळापासून विमान अपघातांच्या घटनांमुळे हवाई सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बारामती विमानतळावर अलीकडच्या काळात घडलेल्या विमान अपघातांच्या घटनांनंतर आता सोलापूर विमानतळावरही शिकाऊ विमानाचा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. उड्डाणासाठी धावपट्टीवर वेग घेत असताना विमान अचानक धावपट्टीवरून घसरून खाली गेले. या अपघातात महिला शिकाऊ वैमानिक सुखरूप बचावल्याने मोठी दुर्घटना टळली. सोलापूर विमानतळ प्रशासनाने याबाबत अजुन अधिकृत माहिती दिलेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर विमानतळावर शिकाऊ वैमानिकांच्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे विमान उड्डाणाच्या तयारीत होते. महिला शिकाऊ वैमानिक विमानाचे उड्डाण करण्याचा प्रयत्न करीत असताना अचानक विमानाचा ताबा सुटल्याने ते धावपट्टीवरून घसरले. विमान धावपट्टीच्या खाली गेल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, या घटनेत वैमानिक महिलेला कोणतीही दुखापत झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे, हे विमान नियमित प्रवासी वाहतुकीसाठी वापरले जाणारे नसून वैमानिक प्रशिक्षणासाठी वापरण्यात येत होते. त्यामुळे या घटनेत जीवितहानी टळली. विमान नेमके कोणत्या कारणामुळे धावपट्टीवरून घसरले, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. तांत्रिक बिघाड, विमानाच्या नियंत्रणातील अडचण किंवा अन्य कोणते कारण यामागे होते, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. अहमदाबादच्या दुर्घटनेनंतर बारामती आणि आता सोलापूर येथे घडलेल्या घटनांमुळे विमानांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या विमानांची तांत्रिक तपासणी, वैमानिकांचे प्रशिक्षण आणि उड्डाणापूर्वीच्या सुरक्षा प्रक्रियांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

रील बनवण्याच्या नादात पाच एकर ऊस जळून खाक

नांदेड/प्रतिनिधी- रील बनवण्याच्या नादात केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीचा मोठा फटका एका शेतकऱ्याला बसला आहे. मरळक येथे रील शूट करण्यासाठी आलेल्या काही तरुण-तरुणींनी केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे जवळच असलेल्या ऊसाच्या शेताला आग लागली. या आगीत शेतकरी माणिकराव शिंदे यांचा तब्बल पाच एकरांवरील ऊस जळून खाक झाला आहे. ऊस जळून गेल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून सरकारने भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मरळक गावातील उत्तर वळण रस्त्यावर काही रील स्टार तरुण-तरुणी रील शूट करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे ही आग लागल्याची माहिती समोर आली आहे. रील बनवण्याच्या हौसेपोटी केलेल्या आतषबाजीचा फटका शेतकरी माणिकराव शिंदे यांना बसला. त्यांनी कष्टाने पिकवलेला ऊस या आगीत खाक झाला. आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यावर आता मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. ऊस पेटल्यामुळे थेट आर्थिक फटका बसला असून आधीच दुष्काळ त्यात विक्रीसाठी उपलब्ध असलेला ऊस आगीत खाक झाल्यामुळे शेतकरी माणिकराव शिंदे यांना जगावे कसे, याची चिंता लागली आहे. सार्वजनिक ठिकाणी रील बनवताना फटाक्यांची आतषबाजी करणाऱ्यांवर पोलिसांनी आणि प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. तसेच आगीत जळालेल्या पाच एकर ऊसाच्या नुकसानीची शासनाने तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी माणिकराव शिंदे यांनी केली आहे. रील बनवण्याच्या नादात शेतकऱ्याच्या कष्टाची राख झाली आहे. आता या नुकसानीची भरपाई कोण देणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



नांदेडमध्ये दहा लाखांची धाडसी घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील पवननगरमध्ये अज्ञात चोरट्यांनी एका घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून दहा लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

दिवाळी सण साजरा करण्यासाठी अनेकजण घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत बाहेरगावी गेले आहेत. याचाच फायदा आता चोरट्यांनी घेण्यास सुरुवात केली. पवननगर येथील तुळशीराम थावरा राठोड हे घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत दि.९ नोव्हेंबर रोजी बाहेरगावी गेले होते. अज्ञात चोरट्यांनी दि.९ ते ११ नोव्हेंबरच्या दरम्यान राठोड यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा दहा लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. तुळशीराम राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेंच अभयारण्यातील अपघातात एकाचा मृत्यू;पाच गंभीर जखमी

भाजप आ.फुके यांच्या मुलावर सपकाळ,अंधारेंचे गंभीर आरोप

नागपूर : मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमेवरील नागपूरजवळील पेंच अभयारण्य परिसरात झालेल्या भीषण वाहन अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अपघातग्रस्त वाहन भाजपचे आ.परिणय फुके यांच्या मालकीचे असून, अपघाताच्या वेळी त्यांचा मुलगा यथार्थ परिणय फुके हा मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. या प्रकरणात राजकीय दबावातून दोषींना वाचविण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी मागणी विरोधकांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी समाजमाध्यमांवर अपघाताची छायाचित्रे आणि वाहनाची माहिती प्रसिद्ध करत या घटनेवर संताप व्यक्त केला. एका तरुणाचा जीव गेला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे हे प्रकरण दडपण्याचा किंवा राजकीय दबावाचा वापर करून दोषींना वाचविण्याचा प्रयत्न अजिबात खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. आमदाराचा मुलगा असल्यामुळे कोणालाही कायद्यापासून संरक्षण मिळता कामा नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, हे दाखवून द्यावे, अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही या अपघातावरून भाजपवर निशाणा साधला आहे. एकीकडे महाराष्ट्रातील शेतकरी दुष्काळाच्या संकटात होरपळत असताना दुसरीकडे आमदारांची मुले भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याचे चित्र समोर येत आहे. अशा बेजबाबदारपणामुळे एखाद्याचा जीव गेला तरी संबंधितांना त्याचे गांभीर्य वाटत नाही का, असा **पान ४ वर**

आ.श्रीजया चव्हाण यांची ऊसतोड कामगारांसोबत दिवाळी साजरी

नांदेड/प्रतिनिधी-भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी लक्ष्मीनगर, देगावयेळेगाव, येथील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना परिसरात ऊसतोड कामगारां समवेत दिवाळी साजरी केली.

आ.श्रीजया चव्हाण यांनी दिवाळी निमित्त ऊसतोड कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा देत भेटवस्तू व मिष्टान्नाचे वाटप केले. त्यानंतर त्यांनी कामगारांच्या कुटुंबीयां समवेत स्नेहभोजनाचाही आस्वाद घेतला. या कार्यक्रमाला भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी चेअरमन गणपतराव तिडके यांच्यासह कारखान्याचे संचालक, शामराव पाटील टेकाळे, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निळकंठ मदने, भाजपा युवा मोर्चा अर्धापूर तालुकाध्यक्ष पवन इंगोले, सोशल मीडिया अध्यक्ष गुरुदास रणखंब आदी प्रामुख्याने उपस्थित होते.



किनवट शहरात अतिक्रमणाचा उच्चांक; अपघातांची मालिका सुरुच,प्रशासन गप्प का?नागरिकांचा संतप्त सवाल

किनवट/प्रतिनिधी- किनवट शहरातील उपविभागीय अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय इमारतीपासून ते अय्यप्पास्वामी मंदिरा पर्यंतच्या मुख्य रस्त्यावर अतिक्रमणाने उच्चांक गाठला आहे. पहिलेच अरुंद रस्ते आणि त्यातच रस्त्याच्या दुतर्फा झालेल्या बेकायदेशीर अतिक्रमणामुळे पुन्हा रस्ता अरुंद झालाय. बिल्डिंग मटेरियल दुकान चालकांनी गिट्टी आणि सिमेंटच्या विटांच्या गंज्या, अवजड वाहाने रस्त्यावर उभी केल्याने रस्ते वाहतुकीची कोंडी होत आहे. किनवट पोलीसांनी रस्त्यावर उभे केलेल्या अवजड वाहानांसह बिल्डिंग मटेरियल दुकान चालकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

स्थानिक व्यापाऱ्यांचे रस्त्यावर वाढलेले अतिक्रमण, रस्त्यावरच लावली जाणारी वाहने आणि अनधिकृत हातगाड्यांमुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. मुख्य रस्त्यावरून पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागाच उरलेली नाही. फुटपात/पादचारी



मार्गावरही प्रचंड अतिक्रमणाचा विळखा केलेला आहे. यामुळे या परिसरात वारंवार लहाने-मोठे अपघात घडत असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले तर काहींना अपंगत्व आले आहे. इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही संबंधित नगर पालिका व पोलीस प्रशासन मात्र निद्रावस्थेत असल्याचे चित्र आहे. अपघातांची ही मालिका थांबवण्यासाठी आणि रस्ता मोकळा करण्यासाठी **पान ४ वर**

नांदेडकरांच्या सेवेत आणखी पाच नव्या बसेस दाखल

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने नांदेड आगाराला नव्याने प्राप्त झालेल्या पाच जिजाऊ बसेसचा लोकार्पण सोहळा आ.बालाजीराव कल्याणकर आणि आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

या पाचही बसेस आजपासून नांदेडकरांच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. यावेळी आ.कल्याणकर व आ.बोंढारकर यांनी स्वतः बसमध्ये प्रवास करून बसेसचा अनुभव घेतला. त्यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, अभय देशमुख विभाग नियंत्रक नांदेड, अभिजीत कोरटकर आगार प्रमुख नांदेड, यासीन खान बसस्थानक प्रमुख, सचिनसिंह चौहान, कैवल्य बासवाडेकर, बोधनकर, प्रभारक यांच्यासह इतर उपस्थित होते.



दिवाळीचा आनंद

दिवाळी या सणाला धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वेगवेगळे महत्त्व असले तरी या सणाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला आनंद देणारा हा उत्सव आहे. जगाच्या पाठीवर कदाचित असा दुसरा सण नसेल की जो सलग तीन-चार दिवस इतक्या उत्साहात आणि उत्स्फूर्तपणे साजरा केला जातो. यामुळे दिवाळी या सणाला सणांचा राजा, असेही म्हणतात. तसे पाहिले दिवाळीची तयारी दसऱ्यापासून केली जाते. या सणामध्ये दिवा हा महत्वाचा आहे. हा सणच प्रकाशाचा-तेजाचा आणि झगमगाटाचा महाउत्सव आहे. देशात कश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र घरोघरी दिवे-आकाश कंदिल-पणत्या लावल्या जातात. फटाक्यांची आतिषबाजी केली जाते. आपल्या देशात प्रामुख्याने हिंदू लोक हा सण साजरा करतात. अलिकडे गेल्या काही वर्षांमध्ये धार्मिक ठिकाणी-विविध नद्यांच्या घाटांवर अधिकाधिक दिवे-पणत्या लावण्याचा उपक्रम राबवला जात आहे. यंदाच्या दिवाळीला-लक्ष्मी पूजनाच्या दिवशी अयोध्येत शरयू नदीच्या ५६ घाटांवर मिळून तब्बल ३० लाख दिवे हा एक जागतिक विक्रम आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या राजवटीत, गेल्या १० वर्षात अयोध्येमध्ये दिवे लावण्याची दरवर्षी चढती कमान आहे. मग तो गरीब असो की श्रीमंत, कष्टकरी असो की उद्योजक, प्रत्येक जण आपापल्या आर्थिक परिस्थितीनुसार दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न करतो. कुणाच्या घरी पंचपक्वान्नांची रेलचेल असते, तर कुणाच्या घरात साध्या गोडधोडावर समाधान मानले जाते. मात्र आनंद साजरा करण्याची भावना दोघांचीही सारखीच असते. म्हणूनच दिवाळीचे महत्त्व काही आगळेवेगळे आहे. भाऊबीजेच्याच्या सणाने दिवाळीतील उत्साहाच्या पर्वाची सांगता झाली. यंदाच्या दिवाळीतही दरवर्षीप्रमाणे खरेदी-विक्रीचा मोठा जोर होता. संसारोपयोगी अगदी लहान-सहान वस्तूंपासून-प्लॉट-फ्लॅट तसेच सोने-चांदीपर्यंत बाजारात मोठी उलाढाल झाली. सराफा व्यापारी संघटनेच्या अंदाजानुसार संपूर्ण देशात दिवाळीमध्ये तब्बल ६६ हजार कोटीच्या सोन्याची विक्री झाली. त्याचप्रमाणे दुचाकी-चारचाकी गाड्यांची मोठी विक्री झाली. देशभरात असे उत्साहवर्धक-चमकते चित्र असले तरी आपल्या महाराष्ट्रात-मराठवाड्यात मात्र यंदाची दिवाळी ही दुष्काळी आहे, हे वास्तव आहे. परंतु या उत्सवाच्या आनंदाबरोबरच काही गंभीर प्रश्नही मागे ठेवून ही दिवाळी गेली आहे. मागील तीन-चार दिवसांपासून सर्वत्र दिवाळीचा उत्साह ओसंडून वाहत होता. बाजारपेठा ग्राहकांनी फुलल्या होत्या. कपडे, सोने-चांदी, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, वाहनांची खरेदी यासाठी मोठी गर्दी दिसून आली. दुसरीकडे फटाक्यांच्या आतषबाजीने आकाश उजळून निघाले. मात्र या आनंदोत्सवाची दुसरी बाजूही तितकीच चिंताजनक आहे. फटाक्यांच्या कर्णकर्कश आवाजाने ध्वनिप्रदूषणाची मर्यादा ओलांडली, तर धुरामुळे हवेतील प्रदूषणात मोठी भर पडली. दिवाळी प्रकाशाचा सण असताना त्याच प्रकाशाच्या उत्सवातून प्रदूषणाचा अंधार निर्माण होत असेल, तर आपण नेमके काय साध्य करीत आहोत, याचाही विचार करण्याची वेळ आहे.

बिरसा मुंडा:क्रांतिकारी योध्दा

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. तसेच भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी लढवय्या भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या इतिहासातील कार्याविषयीची ही माहिती....

देशभरातील जनतेमध्ये आणि आदिवासींमध्ये भगवान म्हणून बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. आदिवासी विकास आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे लढवय्ये म्हणून त्यांना आपण सर्वजण ओळखतो. त्यांनी अल्प कालावधीत केलेल्या देशसेवा आणि अत्यंत उल्लेखनीय योगदानाबद्दल ते देशवासियांच्या कायम स्मरणात आहेत.

बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंड राज्यातील तत्कालीन रांची आणि आजच्या खुंटी जिल्ह्यातील उलिहातू गावात आदिवासी कुटुंबात झाला. बिरसांच्या वडिलांचे नाव सुगना मुंडा आणि आईचे नाव कर्मी मुंडा होते. बिरसा मुंडा यांचे प्राथमिक शिक्षण मिशनरी शाळेत झाले. त्या काळात इंग्रजांकडून भारतीयांवर अत्याचार करण्यात येत होते. हे पाहून त्यांनी शालेय जीवनापासून इंग्रज सरकार विरोधात लढा उभारण्याचा निश्चय केला.

हक्कासाठी क्रांतिकारक लढा

वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, सध्याच्या झारखंडमधील उलिहातू गावातील बिरसा, हा तरूण मुलगा वसाहतवादी शोषणाविरुद्ध मोठ्या प्रमाणात प्रतिकार करणारा नायक बनला. जेव्हा ब्रिटीश अधिकारी आणि स्थानिक जमीनदार शोषण करीत होते, त्यांच्या जमिनी बळकावत होते आणि आदिवासी समुदायांवर अत्याचार करीत होते, तेव्हा भगवान बिरसा यांनी या सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आणि लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रेरित केले. 'धरती आबा' म्हणून आदरणीय असलेल्या भगवान बिरसा यांनी १८९० च्या दशकाच्या उत्तरार्धात ब्रिटीश दडपशाहीविरुद्ध 'उलगुलान' किंवा मुंडा बंडाचे नेतृत्व केले. इंग्रजांचा जनतेवरील अन्याय सहन न झाल्याने त्यांनी आयुष्यभर इंग्रजांविरोधात संघर्ष केला.

उलगुलान हा निःसंशयपणे बंडखोरीपेक्षा अधिक तीव्र होता. ही लढाई न्याय आणि सांस्कृतिक ओळख या दोन्हींसाठी होती. बिरसा मुंडा यांच्या पुढाकारामुळे एकीकडे आदिवासींना कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांच्या जमिनीवर मालकी मिळवण्याचा आणि शेती करण्याचा अधिकार मिळाला आणि दुसरीकडे आदिवासी चालीरीती आणि सामाजिक मूल्यांचे महत्त्व देखील एकत्र आणले. महात्मा गांधींप्रमाणेच त्यांचा संघर्षही न्याय आणि सत्याच्या शोधातून प्रेरित होता.

आजारी लोकांची सेवा करणे हे बिरसा यांचे ध्येय होते. त्यांनी औषधोपचार करण्याचे प्रशिक्षण घेतले होते. यशस्वी उपचाराच्या अनेक घटनांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला होता. त्यांनी लोकांना विनंती केली की, कोणत्याही आजारी व्यक्तीला त्यांच्याकडे घेऊन या, जर हे शक्य नसेल तर मी स्वतः आजारी लोकांना भेटायला येईन. ते गावोगावी जाऊन आजारी लोकांना भेटत असत आणि आपल्या कौशल्याने आणि आपल्या उपचाराने असंख्य लोकांना बरे करीत असत. दुष्काळ आणि महामारी आल्यानंतर जनतेचे प्रचंड हाल झाले. अशा काळात बिरसा मुंडा यांनी जनतेची खूप सेवा केली.

दोन वर्षे तुरुंगवास

एकीकडे जनतेचे हाल होत होते, दुसरीकडे इंग्रजांचा जुलूम अशा स्थितीत बिरसा यांनी जनतेवरील कर माफीसाठी इंग्रजांविरुद्ध थेट आंदोलन सुरू केले. बिरसांची वाढती लोकप्रियता इंग्रजाच्या डोळ्यात खुपत होती. त्यांनी दडपशाहीचा वापर करून १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करून हजारीबाग तुरुंगात पाठवले. बिरसा मुंडा येथील तुरुंगात सुमारे दोन वर्षे बंदिस्त राहिले. पुढे १८९७ ते १९०० या काळात ब्रिटिश आणि मुंडा यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली.

बिरसा मुंडा आणि इंग्रज यांच्यात खुंटी येथे ऑगस्ट



१८९७ मध्ये युद्ध झाले, बिरसा मुंडा आणि त्यांच्या सुमारे ४०० सहकाऱ्यांनी अत्यंत धैर्य दाखवित धनुष्यबाणांसह खुंटी पोलीस स्टेशनवर हल्ला केला. १८९८ मध्ये टांगा नदीच्या काठावर मुंडांसह त्यांचे सहकारी आणि इंग्रज यांच्यात प्रचंड संघर्ष झाला. या लढाईत इंग्रज सैन्याचा मानहानीकारक पराभव झाला. परंतु इंग्रजांनी वचपा काढण्याकरिता अनेक आदिवासी नेत्यांना अटक करीत कारवाई करण्यास सुरुवात केली. यानंतर १९०० साली डोंबाडी टेकडीवर दुसरे युद्ध झाले. या लढ्यात अनेक महिलांसह निष्पाप अशा लहान मुलांचा मृत्यू झाला.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती) विभागीय
माहिती कार्यालय,अमरावती

रांचीमध्ये घेतला अखेरचा श्वास

बिरसा मुंडा यांनी युद्ध करून इंग्रजांना जेरीस आणले होते. त्यामुळे फेब्रुवारी १९०० मध्ये इंग्रजांनी बिरसा मुंडा यांना चक्रधरपूर येथून अटक करून रांची तुरुंगात डांबले. येथेच ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मृत्यू कॉलरामुळे झाल्याचे इंग्रज सरकारने सांगितले. मात्र, त्यावेळी कॉलराची कोणतीही लक्षणे दिसली नसल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. वयाच्या २५ व्या वर्षी मुंडा यांचा मृत्यू झाला.

भगवान बिरसा मुंडा यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणाऱ्याला 'बिरसाईच' म्हणतात. आजही त्यांचे अनुयायी त्यांनी सांगितलेल्या विचारधारेप्रमाणे चालतात. बिरसा मुंडा यांनी संपूर्ण जीवन आदिवासी समाजाच्या विकासाकरीता वाहून घेतले होते. अत्याचाराविरोधात आक्रमकपणे लढा देताना त्यांनी इंग्रजांच्या अत्याचाराविरुद्ध बिगुल फुंकले. बिरसा मुंडा हे पुरोगामी विचारवंत आणि सुधारणावादी नेते होते. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाच्या विरोधात जागरूक केले. प्राण्यांना मारणे योग्य नाही, त्यांचा बळी देणे चुकीचे आहे, असे त्यांचे मत होते. पशू-पक्षी यांच्याबाबत सहानुभूती असली पाहिजे, असे सांगून त्यांनी आदिवासींना दारू पिण्यास विरोध केला. बिरसा मुंडा यांनी समस्त आदिवासींचे संघटन करण्यावर भर दिला. झारखंड व्यतिरिक्त बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालच्या आदिवासी भागातही बिरसा मुंडा यांची पूजा केली जाते. रांची येथील कोकर येथे बिरसा मुंडा यांची समाधी आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने 'बिरसाईच' लोक, अनुयायी त्यांना आदरांजली वाहण्यासाठी तिथे जातात.

गौरव दिवस होणार साजरा

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस जनजातीय गौरव दिन म्हणून घोषित केला आहे. आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान, संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा आणि अस्मिता यांचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. बिरसा मुंडा यांच्या वारशाचे स्मरण करण्याचे उद्दिष्ट दीर्घकाळ दुर्लक्षित असलेल्या आदिवासी इतिहासाला भारताच्या इतिहासाच्या केंद्रस्थानी ठेवणे हे आहे. आदिवासी समाजाच्या अमूल्य योगदानाची ओळख होण्यासाठी हा दिवस देशभरात साजरा केला जातो. आदिवासी समाजाने क्रांतिकारी चळवळीतून इंग्रजाशी संघर्ष करताना सर्वोच्च बलिदान दिले. इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध देशातील अनेक आदिवासी चळवळी राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्या होत्या. त्यांनी देशभरातील भारतीयांना प्रेरित केले आहे.

राज्यभर विशेष कार्यक्रम

भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभ करणे तसेच त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरण करण्यावर तसेच पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, सेवा वितरणावर विशेष भर देण्यात येणार आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली येथे देशस्तरावरील मुख्य शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त राज्यातील सर्व जिल्हा आणि अनुसूचित जमातीबहुल तालुका मुख्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा तसेच अन्य आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात येणार आहे. पद्म पुरस्कारप्राप्त आदिवासी व्यक्ती, सामाजिक नायक, समाजसेवक, बुद्धिजीवी, आदिवासी संत-महंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचा सन्मान करण्यात येणार आहे. आदिवासी महापुरुषांच्या नावाने उद्याने, चौक आणि रस्त्यांचे नामकरण तसेच ऐतिहासिक वारशाच्या जतनाचे उपक्रमही राबविण्यात येतील.

इतिहासातील भगवान बिरसा मुंडा आणि इतर अशा काही व्यक्तिमत्वांची नावे माहित नसायची. अलीकडच्या काळात मातृभूमीसाठी त्यांच्या शौर्याचे आणि बलिदानाचे अधिकाधिक लोकांकडून कौतुक केले जात आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव काळात आपल्या संस्कृतीच्या आणि उपलब्धीच्या गौरवशाली इतिहासाची उजळणी साजरी केली गेली. यामुळे देशवासियांना, विशेषत: तरुण पिढीला, अशा महान देशभक्तांच्या शौर्यपूर्ण योगदानाची जाणीव झाली. त्यामुळे भगवान बिरसा मुंडा यांच्या शौर्य आणि पराक्रमी नेतृत्वाची आठवण आजच्या नवीन पिढीला सदैव प्रेरणा देत राहील यात शंका नाही.

भोकरमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रमाने श्रोते झाले मंत्रमुग्ध

भोकर/प्रतिनिधी-दिवाळी सणाचा आनंद सुरांच्या मैफिलीत द्विगुणित व्हावा या हेतूने भोकर विचार विकास मंचने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.झी संगीत सम्राट विजेत्या, सारेगमप लिटल चॅम्प विजेत्या व इंडियन आयडल फेम अंजली गायकवाड व नंदिनी गायकवाड यांच्या बहारदार गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

११ नोव्हेंबर २०२६ रोजी माऊलीधाम मोंढा येथे पहाटे ५:३० वा. आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्रारंभी दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी प.पू. बालयोगी गोवत्स वेंकटस्वामी महाराज, महंत चिंतामणी गुरु धनराज भारती, महंत उत्तम बन महाराज, महंत परमेश्वर महाराज व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले त्यानंतर गणेश स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली गुरुवर्य अंगद गायकवाड यांनी गायलेल्या सुर निरागस हो या गीताने मंगलमय सुरुवात झाली त्यानंतर कु.अंजली गायकवाड व नंदिनी गायकवाड यांनी एकाहून एक बहारदार गीते सादर केली. माझी रेणुका माऊली, नाट्यगीत मन मंदिरा, भावगीत केव्हा तरी पहाटे, अभंग अवघे गरजे पंढरपुर, एक राधा एक मीरा, कुहू कुहू कोयलिया, गवळण घागर घेऊन, या जगण्यावर, दही दूध लोणी, जोगवा लख्ख पडला प्रकाश, हसता हुआ ये चेहरा आणि लावणी आता वाजले की बारा अशा भन्नाट गीतांनी मैफिलीला रंग चढला होता श्रोते तलीन झाले होते लागा चुनरी पे डाग या भैरवीने



कार्यक्रमाची सांगता झाली. शिवकांता पडोळे कु. स्वानंदी पडोळे यांनीही गायन सादर केले. नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, बाजार समितीचे सभापती जगदीश पा. भोसीकर, संचालक रामचंद्र मुसळे, पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड,गटनेता विठ्ठल पा.धोंडगे, नगरसेविका सौ.अर्चना बालाजी बिल्लवार, सौ.वनश्री दिनेश लक्ष्टवार, उद्योजक बंटी राठोड आदींसह, पत्रकार, व्यापारी नागरिक व महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती प्रास्ताविक मंचचे अध्यक्ष डॉ.यू.एल. जाधव यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष प्रा.डॉ.व्यंकट माने यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भोकर विचार विकास मंचच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

विष्णुपुरी परिसरातील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी येथील आबादी भागात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर बुधवारी सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाड टाकुन चार जणांना अटक केली. त्यांच्या जवळून १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

विष्णुपुरीच्या आबादी नगरमध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीसांच्या एका पथकाने बुधवारी सायंकाळी सदरील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून जुगार खेळत असतांना लालबाजी साखरे (वय १८), सोहम सदाशिव डांगे (वय २४), विजय उत्तमराव हंबर्डे, माधव नारायण हंबर्डे सर्व रा.विष्णुपुरी,नांदेड यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्या जवळून पोलीसांनी एक दुचाकी, जुगाराचे साहित्य, दोन मोबाईल व रोख रक्कम असा १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

धानोडा पुलावर मृत्यूचा प्रवास सुरुच ;नवीन पूल असूनही वाहतुकीचा वनवास

सरफराज दोसानी

माहूर-केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आश्वासन, जिल्हाधिकाऱ्यांच्या सक्त सूचना आणि पत्रकारांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा. एवढे सगळे होऊनही धानोडा येथील पैनगंगा नदीवरील नवीन पुलावरून वाहतूक सुरू होत नसेल, तर मग या व्यवस्थेचा उपयोग तरी काय? केंद्रीय मंत्र्यांच्या आश्वासनालाही संबंधित कँत्राटदार आणि विभागीय यंत्रणा जुमानत नसल्याचे चित्र समोर येत आहे. दुसरीकडे, विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावरील जुना पूल अक्षरशः खिळखिळा झाला असताना त्यावरूनच हजारो वाहनांची जीवघेणी येजा सुरू आहे. एखाद्या निष्पाप प्रवाशाचा बळी गेल्यानंतरच प्रशासनाचा डोळा उघडणार आहे काय?

तीर्थक्षेत्र माहूरगडावर दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे भाविकांचा महापूर उसळला आहे. रेणुका मातेच्या दर्शनासाठी सोमवार आणि मंगळवार या दोन दिवसांत हजारो चारचाकी वाहने माहूरमध्ये दाखल झाली. गडाकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा, शहरात वाहतुकीची कोंडी आणि धानोडा येथील जुन्या पुलावर वाढलेला वाहनांचा ताण... असे भयावह चित्र निर्माण झाले आहे. जीर्ण, खिळखिळ्या पुलावरून वाहनांची सततची वर्दळ सुरू असताना प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? विशेष म्हणजे, या प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी पत्रकारांचे शिष्टमंडळाने गेल्या महिन्यात नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेते. महामार्गावरील रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली जाते. गडकरींकडून कामे पूर्ण करण्याचे ठोस आश्वासनही मिळते. मात्र, आश्वासनानंतरही परिस्थिती जैसे थे! असून मग नागपूरच्या बैठकीत मिळालेल्या आश्वासनाचे पुढे झाले तरी काय? मंत्र्यांचे शब्दही संबंधित यंत्रणेला ऐकू येत नसतील, तर सामान्य जनतेच्या तक्रारींचे काय होत असेल, याची कल्पनाच केलेली बरी नवरात्रोत्सवाच्या नियोजन बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनीही धानोडा येथील नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्यासह माहूर शहरातील बंद पथदिवे सुरू करणे आणि पुलाच्या फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविण्याबाबत संबंधित विभागाला सक्त सूचना दिल्या होत्या. नवरात्रोत्सव संपला, दिवाळीची गर्दीही आली; मात्र नवीन पुलावरून वाहतुकीचा श्रीगणेशा काही झाला नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन झाले की त्या केवळ बैठकीच्या इतिवृत्तापुरत्याच मर्यादित राहिल्या? अधिकाऱ्यांच्या आदेशांना जर कोणी किंमत देत नसेल, तर अशा यंत्रणेवर नियंत्रण कोणाचे हा सवाल उपस्थित होतो. महामार्गावरील समस्यांची यादीही काही छोटी नाही. बंद अवस्थेतील पथदिवे, अपूर्ण नाली बांधकाम, फुटपाथवरील पेव्हर ब्लॉकचे रखडलेले काम, अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण जोडणी आणि वनसदृश्य जमिनीच्या अडचणीमुळे रखडलेले मालवाडा घाटातील रस्त्याचे काम... विकासाच्या नावाने उभा केलेला हा समस्यांचा डोंगर प्रवाशांच्या वाट्याला आला आहे. महामार्गावरून सुरक्षित आणि सुखकर प्रवासाचे स्वप्न दाखवायचे आणि प्रत्यक्षात प्रवाशांना खड्डे, अंधार, अपूर्ण कामे आणि धोकादायक पुलांच्या भरवशावर सोडायचे, हाच विकासाचा नमुना आहे काय? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत निर्माण झाला आहे.



गिरीश पा.रावणगावकर यांच्यासह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

भोकर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसला गळती सुरु



भोकर/प्रतिनिधी-तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला गळती सुरू झाली असून पक्षाचे जिल्हाध्यक्ष रावणगावकर यांच्या गावातून व घरातूनच गळतीला सुरू झाली त्यांचे पुतणे जिल्हा कार्यालय प्रमुख गिरीश पाटील रावणगावकर यांनी खा.अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भोकर मध्ये आपल्या कार्यकर्त्यांसह ९ नोव्हेंबर रोजी भाजपामध्ये प्रवेश केल्याने पक्षाची स्थिती डळमळीत होऊ लागली आहे.

भोकर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष पदाची नवीन निवड झाल्यानंतर पक्षाच्या कामाला बळकटी येईल अशी अपेक्षा होती मात्र भोकर नगर परिषदेच्या निवडणुकीत पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनीच प्रचाराला मोठे बळ न दिल्याने निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना पराभव पत्करावा लागला, पराभूत झालेल्या उमेदवारांनी सोशल मीडियावर खळबळ जनक विधाने करून आरोप केले होते, पक्षाच्या निवडणूक खर्च निधीची देखील मोठी चर्चा रंगली होती, अशा करणीला जबाबदार कोण? हा विषय मात्र अनुत्तरीत राहिला, त्या विषयावर पडदाही टाकण्यात आला मात्र कार्यकर्त्यांची नाराजी तेव्हापासून धुमसत आहे, पक्षवाढ नाही, संपर्क नाही, गावामध्ये शाखा नाहीत, पक्षाचे संघटन नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा.रावणगावकर यांचे पुतणे जिल्हा कार्यालयीन सचिव गिरीश पा.रावणगावकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने पक्षाला गळती सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे, रावणगाव येथील काँग्रेसचे विजय पाटील, रविकांत पाटील,गंगाधर कदम यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला असून रावणगावकर यांच्या गावा मधूनच गळतीला सुरुवात झाल्याने पक्षाची ढासळती स्थिती दिसू लागली आहे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष यांची देखील नाराजी असून त्यांची भूमिका देखील डगमगती दिसून येत आहे. येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मोठे खिंडार पडणार असून युवकांच्या नाराजीचा मोठा स्फोट होणार असल्याचे बोलल्या जात आहे.

२० नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत

नांदेड/प्रतिनिधी- जिल्हा परिषदेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या या पेन्शन अदालतीत सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, अर्ज आणि निवेदनांवर चर्चा करून त्यांच्या पेन्शनविषयक अडचणींचे निराकरण करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.२० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता ही अदालत जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे. यामध्ये निवृत्तीवेतनासंदर्भातील विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे संबंधित सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी केले आहे.

ऐन दिवाळीत प्रभाग दोनमधील अंधार दूर; वस्त्या प्रकाशाने उजळल्या

नांदेड/प्रतिनिधी-ऐन दिवाळीच्या सणात गेल्या सहा महिन्यांपासून अंधारात असलेल्या शहरातील तरोडा (बु.) येथील प्रभाग क्रमांक दोनमधील विविध वस्त्यांमध्ये अखेर प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही पथदिव्यांचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने नगरसेवक प्रतिनिधी तथा वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष आकाश जोंधळे यांनी स्वतःच्या खिशातून खर्च करून हा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला.

तरोडा (बु.) येथील जेतवन नगर, सावित्रीबाई फुले नगर, आसरा नगर, ए.पी.जे. अब्दुल कलाम रोड, ऑफिसर कॉलनी आणि देशमुख पेट्रोल पंप परिसरातील नागरिक गेल्या सहा महिन्यांपासून बंद पथदिव्यांमुळे अडचणींचा सामना करीत होते. रात्रीच्या वेळी अंधारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि इतर नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. यासंदर्भात आकाश जोंधळे यांनी महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. मात्र, प्रश्न मार्गी लागत नसल्याने त्यांनी स्वतः आर्थिक खर्च उचलून विविध गल्ल्यांमध्ये नवीन पथदिवे बसविण्याची व्यवस्था केली. त्यामुळे दिवाळीच्या ऐन सणात प्रभागातील वस्त्यांमधील अंधार दूर होऊन संपूर्ण परिसर प्रकाशमान झाला आहे. अनेक महिन्यांनंतर वस्त्यांमध्ये प्रकाशाची व्यवस्था झाल्याने नागरिकांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण आहे. दरम्यान, नगरसेविका श्रीमती सुनीता रूपक जोंधळे यांच्या माध्यमातून प्रभागातील नालीसफाई, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत नागरी सुविधांवरही लक्ष दिले जात आहे.

पोलीस जमादाराच्या कथित छळाला कंटाळून दोन तरुणांचा आत्महत्येचा प्रयत्न

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील दोन तरुणांनी पोलीस ठाण्यातील बीट जमादाराच्या कथित त्रासाला कंटाळून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना दि.९ नोव्हेंबर रोजी घडली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

शुभम राजू राठोड (वय १९) आणि कृष्णा संतोष चव्हाण (वय २१, दोघेही रा. हदगाव) अशी संबंधित तरुणांची नावे आहेत. या दोन तरुणांना संबंधित बीट जमादाराकडून विनाकारण त्रास दिला जात होता. तसेच शिवीगाळ करून धमकावणे आणि पैशांची मागणी केल्याचा आरोप तरुणांनी 'फेसबूक'वर जारी केलेल्या हिडीओत केला आहे. या कथित त्रासाची माहिती देणारा व्हिडिओ त्यांनी घटनेपूर्वी तयार केल्याचेही वृत्त आहे दोन्ही तरुणांनी एका कृषी सेवा केंद्रातून कीटकनाशक खरेदी केल्यानंतर हदगाव शहराजवळील टेकडी परिसरात जाऊन विषारी द्रव्य प्राशन केले. घटनेची माहिती मिळताच युवकांच्नातेवाईकांनी त्यांना तातडीने शहरातील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केल होत प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने इथल्या डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी दोघांनाही नांदेड येथे पाठविण्यात आले. दरम्यान, या प्रकरणातील व्हिडिओची सत्यता तपासून संबंधित आरोपांची निष्पक्ष चौकशीची अशा अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणात पोलीस प्रशासनचे वरिष्ठ अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेतील याकडे नागरिकाचे लक्ष असून हदगाव पोलीस स्टेशन अंतर्गत असे गंभीर प्रकार का घडत आहेत याबाबत नागरिकात चर्चा आहे. हदगाव शहरात अशा गंभीर घटना दिवसेंदिवस वाढ होत असून नागरिक व पोलीस यांचा समन्वय अभाव असल्याच दिसून येत असून याबाबत पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी ही अशा घटनाकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे स्पष्ट जाणवत आहे जर एखादा वरिष्ठ अधिकारी पोलीस स्टेशन मध्ये आले तर ते इथल्या नागरिक सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक पत्रकारांनाही भेटत नाही हे आवर्जून उल्लेख करावा लागेल परिणाम स्वरूप अशा घटना घडत आहे ज्या युवकावर हदगाव पोलीस स्टेशन मध्ये यापूर्वी गंभीर गुन्हे दाखल असून त्याच युवकांनी समाज माध्यमावर कीटकनाशक प्राशन करून आम्ही आत्महत्या करत आहोत इथपर्यंत ह्या युवकांची मानसिकता झालेली आहे यावरून हदगाव पोलीस स्टेशन अंतर्गत दिवसेंदिवस गुन्ह्याचे प्रमाण वाढत असल्याने अशा युवकात 'समुपदेशन' ची नितांत आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

कोरड्या दुष्काळाच्या सावटात दिवाळी सण, महागाईच्या झळा ;रोजगारासाठी स्थलांतर

नरसिंग अन्नमवार

देगलूर/प्रतिनिधी- हिंदू संस्कृतीतील आनंदाचा आणि प्रकाशाचा सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीवर यंदा देगलूर तालुक्यात दुष्काळाची सावट पसरली आहे. तीन महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतीची आर्थिक गणित कोलमडले असून, दुसरीकडे महागाईच्या झळानि सर्वसामान्यांचे सणाचे बजेटही बिघडविले आहे. हाताला काम नाही, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि शेतीतून उत्पन्नाची अशा मावळल्याने यांना दिवाळीच्या उत्साह मंदावला असून, आणि कुटुंबावर नावापुरता सण साजरा करण्याची वेळ आली आहे.

दिवाळी म्हटली की घरांची स्वच्छता, रंगरंगोटी, आकाश कँदील, पणत्या, रांगोळ्या, फराळांची रेलचेल, नवीन कपड्यांची खरेदी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी असे आनंददायी चित्र डोळ्यासमोर उभे राहते. मात्र, यंदा आर्थिक परिस्थितीमुळे या उत्सवाला मर्यादा आल्या आहेत. चकली, करंजी, लाडू, शंकरपाळे यासारख्या फराळांच्या पदार्थापासून ती नवीन कपडे आणि भेटवस्तूपर्यंत अनेक गोष्टीवर नागरिकांनी खर्चाला कात्री लावली आहे.

देगलूर तालुका प्रमुख यांनी शेतीवर अवलंबून आहे यंदा ६०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असली तरी गत तीन महिन्यापासून पावसाने पाठ फिरवली आहे. परिणामी खरीप पिकांची मोठी नुकसान झाले असून शेतातील कामे ठप्प झाली आहेत. भूगर्भातील पाणी पातळी खालावल्याने गावासह वाड्यात तांड्यावर पाणीटंचाई जाणू लागली आहे. जनावरांच्या चाऱ्यांचाही प्रश्न गंभीर बनला आहे. रब्बी हंगामा बाबतही अनिश्चितता निर्माण झाली असून, नोव्हेंबर मध्ये उन्हाळ्यासारखे चटके बसत आहेत.

शेतीतून रोजगार उपलब्ध होत नसल्याने मजूर आणि शेतकरी कुटुंबांनी पुणे, मुंबई, हैदराबाद यासारख्या महानगराकडे रोजगारासाठी धाव घेतली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मंदीचे हे चित्र चिंताजनक असून, कुटुंबांचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न नागरिकासमोर उभा आहे. एकँदरीत, दिव्यांचा प्रकाश घराघरात पोहोचणार असला तरी दुष्काळ, महागाई, बेरोजगारी आणि पाणीटंचाईच्या दुहेरी संकटाने देगलूर तालुक्यातील जनजीवन प्रभावित झाली आहे. त्यामुळे यंदा दिवाळीचा प्रकाश झगमगणार असला, तरी सर्वसामान्यांच्या मनातील आनंद मात्र आर्थिक विवांचनेमुळे मंदावल्याचे वास्तव समोर आली आहे. खाद्यतेल, साखर, डाळी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे फराळ तयार करणे ही महाग झाले आहे. भाजीपाला, फळे आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरवाढीने खर्चात आणखी भर पडली आहे. देगलूरच्या सराफा, कापड आणि किराणा बाजारात अपेक्षित गर्दी दिसत नसून सोने -चांदी , मिठाई, वाहने आणि नवीन वस्तूंच्या खरेदी कडे ग्राहकांची पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयांची सहाय्यता रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. तालुक्यातील महसुली गावे, हजारो सातबारा धारक शेतकरी आहेत. मात्र, शेतीचे नुकसान, उत्पादन खर्च आणि वाढत्या आर्थिक अडचणीच्या तुलनेत पाच हजारांची मदत तुटपुंजी असल्याची भावना शेतकऱ्याकडून व्यक्त केली जात आहे.



(छाया : विनोद महाबळे)

लोहा-दिवाळी सणानिमित्त आपआपल्या गावाकडे जाणाऱ्या नागरीकांची संख्या वाढल्याने बसमधील प्रवाशांची गर्दी वाढली आहे. परिणामी लोहा बसस्थानक प्रवाशांनी गजबजून गेले असून बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

शिवसेनेच्या वतीने गरजू कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप

नायगाव/प्रतिनिधी-दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब, गरजू आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून शिवसेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून आनंदाचा शिधा वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत नायगाव परिसरातील अनेक गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करून त्यांच्या दिवाळीच्या आनंदात भर घालण्यात आली.

जिल्हाप्रमुख गंगाधररावजी बडूरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच गंगाधर कोतेवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा शिधा वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांच्या घरातही दिवाळीचा आनंद पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून पिंटू पाटील आंतरगांवकर, शिवतेज प्रतिष्ठानचे मराठवाडा अध्यक्ष साहेबराव सूर्यकार, माणिक कोतेवार, पुनमभाऊ धमनवाडे गोळेगांवकर, श्रीनिवास जाधव, प्रमोद सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे असताना सणासुदीच्या काळात त्यांना मदतीचा हात देणे ही काळाची गरज आहे. याच भावनेतून गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या वतीने करण्यात आला.

माहूर गडावर दिवाळीच्या सुट्ट्यांत भाविकांची अलोट गर्दी;घाटातील रस्ते जाम

पायऱ्या चढताना भाविकाचा हृदयविकाराने मृत्यू;गरुडगंगेजवळ ऑटो पलटी होवून महिला जखमी

माहूर/प्रतिनिधी-माहूर गडावर दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे भाविकांची प्रचंड गर्दी उसळली असून, गडाकडे जाणाऱ्या घाटातील रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक पूर्णपणे ठप्प होत आहे. वाहनांची गर्दी आणि वाहतूक कोंडीमुळे अनेक भाविकांना गडावर जाण्यासाठी लांब अंतर पायी चालत जावे लागत आहे. दरम्यान, गर्दीच्या या काळात अपघात आणि दुर्घटनांचे सत्रही सुरू झाले आहे.

मंगळवार दि.१० नोव्हेंबर रोजी पायऱ्या चढताना संभाजीनगर येथील एका भाविकाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास गरुडगंगेजवळ भाविकांना घेऊन जाणारा ऑटो पलटी झाल्याने एका महिला भाविकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर अन्य तिघेजण किरकोळ जखमी झाले. आर्वी जिल्हा वर्धा येथील पुष्पा यशवंत शेंडे (वय ५७), तुषार यशवंत शेंडे (वय २६), रीतेश विनायक शेंडे (वय १८) आणि नितीन विनायक शेंडे (वय १७) हे भाविक वर्धा येथून बसने माहूर येथे दर्शनासाठी आले होते. माहूर शहरातून त्यांनी एमएच २६ ५८९ क्रमांकाचा ऑटो भाड्याने घेतला. श्री अनुसया माता व श्री दत्तशिखराचे दर्शन घेतल्यानंतर रेणुका मातेच्या दर्शनासाठी परत येत असताना गरुडगंगेजवळ सदर ऑटो अचानक पलटी झाला. या अपघातात पुष्पा शेंडे यांच्या डोक्याला गंभीर मार लागला, तर अन्य तिघांना किरकोळ दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच श्री रेणुका देवी संस्थानच्या रुग्णवाहिकेद्वारे जखमींना माहूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ.अक्षय सांगळे यांनी प्राथमिक उपचार केले. गंभीर जखमी महिला भाविकेला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आले. एकीकडे दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे माहूर गडावर भाविकांचा ओघ वाढत असताना दुसरीकडे घाटातील वाहतूक कोंडी, पायी प्रवासाचा त्रास आणि अपघातांच्या घटनांमुळे भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता घाटातील वाहतूक नियोजन, वाहनांवर नियंत्रण आणि आपत्कालीन मदतीची व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज व्यक्त होत आहे.



अंधारलेल्या स्मशानभूमीत माणुसकीचा दीपोत्सव!

कंधार/प्रतिनिधी-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कंधार येथील स्मशानभूमीत युवकांनी दीपोत्सव साजरा करत सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन घडवले. दिवाळीच्या निमित्ताने स्मशानभूमीत दिव्यांची रोषणाई करण्यात आली. तसेच गरजू व्यक्तींना आणि स्मशानभूमीत काम करणाऱ्या व्यक्तींना कपडे व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून युवकांनी त्यांच्यासोबत आनंदाची दिवाळी साजरी केली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला कंधारचे पोलीस निरीक्षक भडीकर यांनी भेट देत युवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. सण केवळ स्वतःच्या आनंदासाठी नसतात, तर समाजातील गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठीही असतात, हा माणुसकीचा संदेश या युवकांनी आपल्या कृतीतून दिला. या उपक्रमात रवी सिद्धनाथ, प्रशांत फुके, प्रदीप फुके, व्यंकटेश देवकते, सचिन श्रीमंगले, अक्षय तेलंग, संग्राम ठाकरे, सार्थक पाठक, अजय मोरे, विठ्ठल मुनगीलवर, व्यंकटेश मुखेडकर, गगन यमेकर, नितीन संगणवार, दिग्विजय दिग्रसकर, वैभव बोडके,शिव गरजे, रुद्र पापटवार, अजय भंडारे, ललित भायगावे, बालाजी कळने आणि गिरीश केंद्रे यांच्यासह युवकांनी सहभाग नोंदवला.

गोकुळमध्ये भाजप-महायुतीकडून लोकशाहीची हत्या;भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा आरोप

मुंबई/प्रतिनिधी-कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातील सत्तासंघर्षात भाजप-महायुती सरकारने हस्तक्षेप करून सहकार क्षेत्रातील लोकशाहीची हत्या केल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलने केला आहे. अध्यक्ष निवडीसाठी चार शासननियुक्त संचालकांचा समावेश करण्यासाठी अध्यादेश काढण्याच्या निर्णयावर पक्षाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

सहकारी संस्थांचा कारभार सभासदांच्या मतदानातून व्यक्त झालेल्या जनमतावर चालला पाहिजे. मात्र, राजकीय स्वार्थासाठी शासनयंत्रणेचा वापर करून निवडून आलेल्या संचालकांच्या अधिकारांवर गदा आणली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. गोकुळ हा कोणत्याही राजकीय पक्षाचा खासगी मालमत्तेचा भाग नसून लाखो दूध उत्पादक शेतकरी आणि सभासदांच्या कष्टातून उभा राहिलेला सहकारी संस्थेचा वारसा आहे, असेही पक्षाने स्पष्ट केले. गोकुळमधील शासन हस्तक्षेपाची निष्पक्ष चौकशी करावी, चार शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीचा कायदेशीर आधार स्पष्ट करावा आणि अध्यादेशाची घटनात्मक वैधता तपासावी, अशी मागणी पक्षाने केली आहे. सहकार चळवळ, शेतकऱ्यांचे अधिकार आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी दिला आहे.

पायल पेंदोर यांच्या पतीला ग्रामीण रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी पदी नियुक्तीपत्र प्रदान

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी येथील एका गरीब आदिवासी कुटुंबातील पायल प्रवीण पेंदोर यांचा प्रसूतीदरम्यान झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर, त्यांच्या नवजात बालकाच्या डोक्यावरील आईचे छत्र हरपले होते. या अत्यंत दुःखद व संवेदनशील घटनेची गंभीर दखल घेत माजी जि.प. सदस्य प्रफुल राठोड यांनी तातडीने पाठपुरावा केला, ज्याचा परिणाम म्हणून आता पायल यांच्या पतीला बळीराम पाटील ग्रामीण रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

पायल प्रवीण पेंदोर यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत होती. या दुःखद प्रसंगी प्रफुल्ल राठोड आणि डॉ. प्रशांत राठोड यांनी पीडित पेंदोर कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना आधार दिला. कुटुंबीयांचे सांत्वन केल्यानंतर प्रफुल्ल राठोड व डॉ. प्रशांत राठोड यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके यांच्याकडे पायल यांच्या पतीला बळीराम पाटील ग्रामीण रुग्णालयात वर्ग-४ कर्मचारी म्हणून नोकरीत सामावून घेण्याची ठाम मागणी केली होती. प्रशासनानेही या माणुसकीच्या दृष्टिकोनातून केलेल्या मागणीला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. परिणामी, दि.१२ नोव्हेंबर रोजी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजेश पवार यांच्या शुभहस्ते पायल यांच्या पतीला नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. सध्या ही नियुक्ती प्रक्रिया पार पडली असून, त्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबतची पुढील प्रशासकीय कार्यवाही सध्या सुरू आहे.



उमरखेडमध्ये मोकाट श्वानांनी मांडला उच्छाद; आठवड्याभरात २५ जण जखमी

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड शहरात मोकाट आणि पिसाळलेल्या श्वानांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून गेल्या आठवड्याभरात तब्बल २५ नागरिकांचा त्यांनी चावा घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नगरपरिषद प्रशासनमात्र अजूनही कुंभकर्णी झोपेत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

गेल्या आठवड्यात एकाच दिवशी पंधरा नागरिकांवर मोकाट श्वानांनी हल्ला करून त्यांना जखमी केले होते. त्यानंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. पाटील नगरात पिसाळलेल्या श्वानाचा धुमाकूळ अजूनही सुरू असून लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच ९ आणि १० तारखेला या परिसरात एका पिसाळलेल्या श्वानाने ५ ते ६ जणांना चावा घेतला. या घटनेची माहिती तात्काळ नगरपरिषदेला देण्यात आली होती. मात्र, पालिकेचे कर्मचारी किंवा श्वान पकडणारे पथक घटनास्थळी फिरकलेच नाही, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा त्याच श्वानाने परिसरातील आणखी काही नागरिकांवर हल्ला केला. अखेर प्रशासन मदतीला येत नसल्याचे पाहून संतप्त नागरिकांनी स्वतःच पुढाकार घेत त्या पिसाळलेल्या श्वानाचा बंदोबस्त केला आणि पुढील मोठा अनर्थ टाळला. नागरिकांनी पिसाळलेला श्वान ठार केल्यानंतर त्याची माहिती पालिकेला दिली. त्यानंतर मात्र पालिकेने कमालीची तत्परता दाखवत तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृत श्वानाला उचलून नेले. जिवंत श्वान नागरिकांचे लचके तोडत असताना गायब असणारे प्रशासन मृत श्वानासाठी लगेच हजर झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

खा.अजित गोपछेडे यांच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे उपोषण मागे

धर्माबाद/प्रतिनिधी-शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या तीन दिवसांपासून गोदावरी नदीच्या पुलाखाली शेतकरी जन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने डॉ. भगवानराव मनुरकर यांच्या नेतृत्वाखाली धर्माबाद आणि बिलोली तालुक्याच्या मध्यभागी असलेल्या दिग्रस-चिर्ली येथील पुलाखाली सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाची दखल घेत खा.डॉ. अजित गोपछेडे यांनी आंदोलनस्थळी धाव घेतली. खासदारांनी शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेत शासनाकडे तातडीने पाठपुरावा करण्याचा शब्द दिल्यानंतर, त्यांच्या विनंतीला मान देऊन शेतकऱ्यांनी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

धर्माबाद आणि बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर शासन दरबारी न्याय मिळावा, या मागणीसाठी शेतकरी जन आंदोलन संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेतला होता. डॉ. भगवानराव मनुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो शेतकऱ्यांनी भर उन्हात आणि प्रतिकूल परिस्थितीत गोदावरी नदीवरील पुलाखाली बेमुदत उपोषण सुरू केले होते. या आंदोलनामुळे परिसरातील वातावरण चांगलेच तापले होते. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी खा.अजित गोपछेडे यांनी स्वतः उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलक शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी डॉ. भगवानराव मनुरकर, साईनाथ पाटील रोषणगावकर, तानाजी पाटील, माधवराव पाटील बोळसेकर आणि प्रल्हाद पाटील ढगे यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा पाढा वाचत आपल्या तीव्र भावना आणि व्यथा खासदारांसमोर मांडल्या. शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर, हे सर्व प्रश्न शासन स्तरावर प्राधान्याने मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन खा. गोपछेडे यांनी दिले. तसेच उपोषण मागे घेण्याची विनंती केली. खासदारांच्या शब्दाला मान देऊन आंदोलकांनी उपोषण मागे घेतल्याचे जाहीर केले. या आंदोलनाला परिसरातील सर्वच स्तरांतून मोठा पाठिंबा मिळाला.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विश्वासू प्रवाशी संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णाजी उमरीकर यांना पत्रकारितेत माऊली फौंडेशन तर्फे जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल विश्वासू प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर व बस स्थानक प्रमुख यासीन खान यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ग्यानोबाराव टीमके, नंदू पाटील, व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरुन

विलिनीकरणावरुन...

सांगितले जाते. मात्र, पक्षाचे नेतृत्व जो अंतिम निर्णय घेईल, त्यासोबत राहण्याची तयारी रोहित पाटील यांनी दर्शविल्याची माहिती आहे. त्यामुळे विलिनीकरणाचा निर्णय झाल्यास रोहित पवार यांची पुढील भूमिका काय असेल, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. राष्ट्रवादीतील तिसरा मतप्रवाह विलिनीकरणाऐवजी स्वतंत्र गट म्हणून सत्तेत सहभागी होण्याच्या बाजूने असल्याचे समजते. अजित पवार यांच्या पक्षात विलीन होण्यापेक्षा स्वतंत्र राजकीय ओळख कायम ठेवून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी व्हावे, असे काही आमदारांचे मत आहे. त्यामुळे सत्तेत जाण्याचा मार्ग स्वीकारायचा असला तरी विलिनीकरणाची अट स्वीकारायची की नाही, यावरही पक्षात मतभेद असल्याचे चित्र आहे. या सर्व घडामोडींमध्ये शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची मानली जात असली तरी ते स्वतः विलिनीकरणाच्या चर्चेपासून अलिप्त राहणार असल्याची चर्चा आहे.

पेंच अभयारण्यातील अपघातात...

सवाल त्यांनी उपस्थित केला. अंधारे यांनी केलेल्या पोस्टनुसार, चार दिवसांपूर्वी पेंच अभयारण्य परिसरातून नागपूरकडे येत असताना हा अपघात झाला. वाहनात पाच तरुण आणि पाच तरुणी असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यातील काही जण मद्यधुंद अवस्थेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या दुर्घटनेत दिशांत अली या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जणांची प्रकृती अतिगंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या अपघाताची नोंद मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यातील कुई पोलीस ठाण्यात करण्यात आल्याची माहितीही अंधारे यांनी दिली आहे.

किनवट शहरात अतिक्रमणाचा...

प्रशासन कठोर कारवाई कधी करणार, असा संतप्त सवाल आता शहरातील नागरिक विचारत आहेत. प्रशासन आणखी किती बळी जाण्याची वाट पाहातेय. वाहतुकीची कोंडी रोखवायची असेल तर तात्काळ अतिक्रमण हटाव मोहीम राबवून बिल्डिंग मटेरियल आणि अवजड वाहने जप्त करण्यात यावीत अशी जोरदार मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **KUDALE SHIVRAJ LAXMANRAO** which now I am, changing as (new name) **SHIVRAJ LAXMAN KUDALE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
SHIVRAJ LAXMAN KUDALE
R/o Plot no.17, Ravi nagar Taroda naka
Taroda bk Nanded-431605
Mob.no. 9890309358

CHANGE IN NAME

My (old name) is **LAXMANRAO** which now I am, changing as (new name) **LAXMAN SAMBHAJI KUDALE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
LAXMAN SAMBHAJI KUDALE
R/o Plot no.17, Ravi nagar Taroda naka
Taroda bk Nanded-431605
Mob.no. 9665212659

CHANGE IN NAME

My (old name) is **SURVE RAHUL** which now I am, changing as (new name) **RAHUL RAJENDRA SURVE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
RAHUL RAJENDRA SURVE
R/o H.no.1-1334, Vijay nagar Housing Society,
Vijay nagar Nanded-431602
Mob.no. 8421214389

नांदेडमध्ये १४ नोव्हेंबरपासून जागतिक लॉन टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

नांदेड/प्रतिनिधी- कोहिनूर आणि एनईएस सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एमटी २०० वर्ल्ड मास्टर्स लॉन टेनिस चॅम्पियनशिप-२०२६ या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १४ ते १९ नोव्हेंबर दरम्यान सायन्स कॉलेज येथील सदाशिवराव पाटील क्रीडा संकुलात होणार आहे.

१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार असून, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए (डॉ.) प्रवीण पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, दैनिक प्रजावाणीचे संपादक शांतनू डोईफोडे आणि नांदेड क्लबचे सचिव डॉ. मनीष देशपांडे उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितीत नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल अग्रवाल, सचिव श्यामल पाटकी आणि सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर यांची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धेचे स्पर्धा संचालक म्हणून अली पंजवानी आणि एस. हरजींदरसिंग चिरागिया काम पाहणार आहेत. सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे आणि क्रीडा संचालक तथा आयोजन सचिव डॉ. अश्विन बोरिकर हे या स्पर्धेचे निमंत्रक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेमुळे नांदेडच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळणार असून, टेनिसप्रेमींना दर्जेदार खेळाचा आनंद घेता येणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४